# कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीकरीता येणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना:-

१. उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे / प्रमाणपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली असल्याने, या परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. पदासाठी पात्र नसताना उमेदवाराने ऑनलाईन परीक्षा दिली असल्यास व कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सदर उमेदवार अपात्र ठरल्यास सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची असेल. यासाठी सिडको महामंडळ जबाबदार राहणार नाही.

२. जाहिरातीत नमुद केलेल्या विविध पदांसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेअंतर्गत उमेदवाराने सदर अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

३. उमेदवाराने कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच अनुभव प्रमाणपत्रांच्या मूळ **(ORIGINAL)** प्रतीसह स्वयंसाक्षांकित प्रती (Self Attested) खाली नमूद केलेल्या क्रमाने सादर कराव्यात-

| **अ.क्र.** | **सादर करावयाची प्रमाणपत्रे / कागदपत्रे मुळ व स्वयंसाक्षांकित प्रतींसह**<br>**(Set of original documents/certificates along with self-attested copies)** |
|---|---|
| १. | पॅन कार्ड (PAN Card) |
| २. | आधार कार्ड (Aadhar Card) |
| ३. | जन्मतारखेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेला जन्म दाखला (नसल्यास माध्यमिक-उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (SSC- HSC) उत्तीर्ण प्रमाणपत्रे)<br>(Birth Certificate from Competent Authority/ SSC/HSC passing certificate) |
| ४. | महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र<br>(Domicile certificate of Maharashtra State) |
| ५. | सक्षम प्राधिकरणाने जारी केलेले जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>(Caste certificate issued by Competent Authority (If Applicable)) |
| ६. | सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>(Caste Validity certificate issued by Competent Authority (If Applicable)) |
| ७. | इमाव/विजा-अ/भज-ब/भज-क/भज-ड/महिला आरक्षण यांचेकरीता प्रगत व उत्पन्न गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र<br>(Non Creamy Layer Certificate for OBC/VJ-A/NT-B/NT-C/NT-D/Women Reservation) |
| ८. | माध्यमिक शालांत परीक्षेची (SSC) मूळ गुणपत्रिका. गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकित प्रत माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र<br>(SSC mark sheet and passing certificate) |
| ९. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेची (HSC) मूळ गुणपत्रिका. गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकित प्रत उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र<br>(HSC mark Sheet and passing certificate) |
| १०. | जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी व पदव्युत्तोर पदवी (MBA) परीक्षा उत्तीर्ण केल्याची गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| | (Mark sheet and degree certificate of having passed the degree examination and post-graduation degree (MBA) from a recognized university, as per the educational qualification mentioned in the advertisement.) |
| ११. | जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी विषयाची पदवी असल्यास परीक्षा उत्तीर्ण केल्याची गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र<br>(As per the educational qualifications mentioned in the advertisement, if holding a degree in Law from a recognized university, the mark sheet and degree certificate of having passed the examination) |
| १२. | अर्ज भरतेवेळी नमूद केलेल्या आस्थापनांच्या मूळ अनुभव प्रमाणपत्रांसह छायांकित प्रती तसेच सध्या कार्यरत आस्थापनेचे शेवटचे वेतन प्रमाणपत्र किंवा पुर्वीच्या आस्थापनेवरील शेवटचे वेतन प्रमाणपत्र (Experience certificate/s along with current or last pay slip) |
| १३. | सध्या कार्यरत असलेल्या आस्थापनेचे / कार्यालयाचे मूळ स्वरूपातील ना-हरकत प्रमाणपत्र<br>(No Objection Certificate from the current Employer) |
| १४. | इतर शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या संबंधित इतर कागदपत्रे, (असल्यास)<br>(Other supporting documents related to qualification, experience, if any) |
| १५. | शासन निर्णय मानंम २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४.०२.२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र.<br>(Government Resolution No. MANM-2012/PR.No.277/39, dated 04.02.2013,<br>MS-CIT or an equivalent computer certificate) |
| १६. | समांतर आरक्षणाबाबत प्रमाणपत्र (माजी सैनिक, महिला आरक्षण, प्रावीण्यप्राप्त खेळाडू)<br>(Certificate regarding Horizontal reservation (Ex-servicemen, Women Reservation, Meritorious Sports Person)) |
| १७. | दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र<br>(Certificate of Disability and UDID Card) |
| १८. | सामाजिक आरक्षणाबाबत प्रमाणपत्र<br>(Certificate regarding Vertical Reservation) |
| १९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>(Certificate of Economically Weaker Section (if applicable)) |
| २०. | सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचे प्रमाणपत्र<br>(Certificate of Socially and Educationally Backward Class (if applicable)) |
| २१. | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन<br>(Small Family Form) |
| २२. | नावात बदल झाल्याबाबतचा पुरावा<br>(Documents regarding Name Change, if applicable) |

४. उमेदवाराने महाराष्ट्र राज्यामधील रहिवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा त्याची उमेदवारी रद्द केली जाईल. (महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दि. १०.०७.२००८ सदर प्रकरणी लागू राहील.)

५. उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

६. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

८. उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित उमेदवाराचे चारित्र्य पडताळणीबाबतचे पत्र संबंधित पोलीस स्टेशनमधून सिडको कार्मिक विभागास दिलेल्या मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.

९. उमेदवाराने कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीसाठी दिलेल्या स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून व त्याकरीता सिडको प्रशासनातर्फे उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता देण्यात येणार नाही. तसेच मानवी अपघात अथवा नैसर्गिक आपत्ती इत्यादींमुळे कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवारांस विलंब / गैरहजर / हानी झाल्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.

१०. उमेदवाराची कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीची तारिख, वेळ/स्थळ बदलण्याबाबतची विनंती ग्राह्य धरली जाणार नाही व त्याबाबत सिडको महमंडळाशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येऊ नये.

११. काही अपरिहार्य कारणास्तव कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या तारखेमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात / ई-मेल च्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार सिडको प्रशासनास आहेत.

१३. कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी व निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार सिडको प्रशासनास राहतील याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१४.कागदपत्रे पडताळणीसाठी अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा, निवड प्रक्रियेच्या पुढच्या टप्प्यासाठी विचार केला जाणार नाही.**

**१५.या भरती प्रक्रियेसंबंधीत संपूर्ण माहिती केवळ सिडकोच्या https://cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'career' या शीर्षकाअंतर्गत "Current Vacancies" मध्ये उपलब्ध करण्यात येईल, याची प्रत्येक उमेदवाराने नोंद घ्यावी.**

**व्यवस्थापक (कार्मिक)**

**२१.०८.२०२५**